# नाशिक महानगरपालिका
## शिक्षण विभाग

### स्मार्ट स्कूल प्रकल्प

नाशिक महानगरपालिका शालेय शिक्षणात आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या आणि महानगरपालिकेच्या शाळांचे स्मार्ट स्कूलमध्ये परिवर्तन करून विद्यार्थ्यांच्या जीवनात मोठा बदल घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून, स्मार्ट स्कूल प्रकल्पांतर्गत आयसीटी आणि डिजिटल लर्निंग सोल्यूशन्स, भौतिक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, क्रीडा सुविधा, आरोग्य इ. सारख्या उपक्रमांमध्ये गुंतवणूक करण्याकरिता इच्छुक राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय संस्था, ट्रस्ट, स्वयंसेवी संस्था, इम्पॅक्ट इन्व्हेस्टमेंट फर्म्स इत्यादींकडून भागीदारी करण्याच्या तसेच सीएसआर निधी मिळविण्याच्या प्रयत्नात आहे

मनपाच्या शिक्षण विभागाने सध्याच्या १०० महापालिका शाळांचे (८८ प्राथमिक व १२ माध्यमिक) स्मार्ट स्कूलमध्ये परिवर्तन करण्याचा विचार केला असून, त्यांना उत्तम व अद्ययावत पद्धतींनी सुसज्ज करून शाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ८४५ वर्गखोल्यांमधील सुमारे २९००० विद्यार्थी आणि ९४९ शिक्षकांच्या जीवनमानावर सकारात्मक आणि दूरगामी परिणाम होणार आहे .

इच्छुक संस्था यासाठी अनुदान, देणग्या, प्रकल्पासाठी लागणारी संसाधने किंवा खालील प्रमुख क्षेत्रांच्या अंमलबजावणी आणि अंमलबजावणीसाठी भागीदारीच्या स्वरूपात आपले योगदान देऊ शकतात.

**१. आयटी पायाभूत सुविधा:**
- ✓ **हार्डवेअर:** संगणक प्रयोगशाळा, इंटरएक्टिव्ह पॅनेल / स्मार्ट बोर्ड आणि स्मार्ट स्कूल तयार करण्यासाठी लागणारी इतर आयटी उपकरणे आणि नेटवर्किंग
- ✓ **सॉफ्टवेअर:** आयसीटी सोल्यूशन्स, डिजिटल लर्निंग रिसोर्सेस, विद्यार्थ्यांसाठी लर्निंग आउटकम असेसमेंट, स्कूल ईआरपी, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टम इ.

**२. भौतिक पायाभूत सुविधा:**
- ✓ ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, वॉश, बाला, फर्निचर, वृक्षारोपण, किचन गार्डन, आर्किटेक्चरल लँडस्केप इ. शाळा पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा.

**३. खेळ/कला/संगीत विकास:**
- ✓ विद्यार्थ्यांना सुविधा/उपकरणे/प्रशिक्षण इ. उपलब्ध करून देणे

**४. शिक्षक प्रशिक्षण आणि क्षमता विकास**
- ✓ कार्यशाळा, प्रशिक्षण तसेच त्यासाठी इतर शाळा/ संस्थांना भेटी इ.

**५. शाळांमध्ये आरोग्य आणि पोषण विषयी योगदान**

**६. प्रत्येक शाळेत पिण्याच्या सुरक्षित पाण्यासाठी वॉटर प्युरिफायर/आरओ बसवणे**

**७. प्रत्येक शाळेत इको-फ्रेंडली शौचालये बसवणे**

स्मार्ट स्कूल प्रकल्पासाठी लागणारी संसाधने पुरविण्याकरिता अथवा देणगी, अनुदान स्वरूपात निधी सहाय्य / वित्तपुरवठा करण्यास इच्छुक संस्था नाशिक महानगरपालिकेशी ५ वर्षांसाठी सामंजस्य करार करू शकते.

या संदर्भात आपल्या सोबत पुढील चर्चा करणेसाठी महानगरपालिका उत्सुक आहे. स्मार्ट स्कूल प्रकल्प अंमलबजावणीसाठी सल्लागार संस्थेच्या सदस्यांशी खालील ई-मेल वर संपर्क करू शकता. स्मार्ट स्कूल प्रकल्प अंमलबजावणीसाठी सल्लागार संस्थेच्या सदस्यांशी संपर्क करण्यासाठी ई-मेल

anshuman.kumar@thepalladiumgroup.com, harshad.wagh@thepalladiumgoup.com